
ऑक्टोबर-नोव्हेंबर·२०१४
अनाहत
साहित्य संस्कृती प्रकाशन
"संस्कृती, कला, जाणिवा जोडणारा सेतू"

# अनुक्रमणिका


ती ना हवेतून येत ........ ५

मला जमायला हवं होतं गणित ........ ७

मग डोळे मिटून घेणंही ........ ९

भ्रम ........ ११

जुगलबंदी ........ १२

तुला कसे सगळे कळते? ........ १८

हत्याकांड ........ १९

स्वप्न-सेतू ........ २०

शिवजयंती ........ २२

मी पाहिलं उन्हाला ........ २४

एक नातं ........ २६

काळजातली दारूभट्टी ........ २८

सिल्विया ........ ३१

मनीषा ........ ३२

गुन्हा ........ ३४

चक्र ........ ३४



साहित्य संस्कृती
संस्कृती, कला, जाणिवा जोडणारा सेतू

विजयादशमी शुभचिंतन......................................................३५

मौनमुद्रा..............................................................३७

शाश्वती..............................................................३९

एखादी कविता ........................................................४१

तुझे संपलेले दुःख......................................................४३

निरंजनाची कविता ....................................................४५

कवी सुधीर ............................................................५१

सायलेंट मोडमधल्या कविता: नव्या जाणिवांची विचक्षण कविता
..........................................................................५८

कविता- ऑडियो........................................................७०

# अनाहत सप्टेंबर २०१४

मला कवितांविषयी वाटणारी ओढ निरर्थक नाही अशी एक सुखद जाणीव हा विशेषांक प्रकाशित करतांना मनात आहे. कवितांमध्ये येणारी सभोवतालची परिस्थिती, त्याचे पडसाद, त्याला दिलेला प्रतिसाद हे फक्त तेवढ्यापुरत असतं असं मी मानत नाही. किंबहुना व्यक्त होणा-या काहींकरता त्यांची कविता हिमनगाचे वरचे टोक असते. मनात अखंडपणे चालणा-या विचारांचा एक तुकडा, एक आवर्तन, एक काळाचा तुकडा कवितेच्या रूपात येतो. पण ते विचार वा व्यक्त होणं तिथच थांबलेलं नसतं. म्हणूनच तुम्हाला या कवितेत एक कथा दिसेल, एक पटकथा वा संहिता सुद्धा दिसेल. त्यामध्ये हाडामासाची माणसे भेटतील, विविध रूपात निसर्ग दिसेल. प्रतिसृष्टी दिसेल. या कवितांनी प्रश्न उभे राहतील, उत्तरेही मिळतील.

या अंकातली मराठी कविता वाचतांना अनेक ओळखीची नावे तर दिसतीलच पण त्याशिवाय ज्यांच्या कवितांना स्वतःचा असा चेहरा आहे अशी नावेही आवर्जून दिसतील.

जगाच्या पाठीवर विखुरलेली माणसे या कवितेतून, लेखांमधून तुमच्याशी संवाद साधतील याची खात्री आहे.

अधिकाधिक रसिकांपर्यंत हा अनाहतचा विशेषांक जावा यासाठी सहकार्य करावे अशी रसिकांना नम्र विनंती.

आपणा सर्वांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**-सोनाली जोशी**

## ती ना हवेतून येत

ती ना हवेतून येत
ना पाण्यातून ना जमिनीवरून
पहारेकऱ्यांसमोरून मुक्त संचार
करत सहज भिडते ती अत्यंत
धोक्याच्या आकाशाला
तिच्या मनाने इच्छाही करण्यापूर्वी

तो स्पर्श पटीपटींनी वाढवत नेतो
किलबिलत्या पानांचे स्फोट
होतात जंगले, समुद्र अपरंपार
मस्तीत घुमणारे मोर

त्या स्पर्शाने नंतर
तिचे सर्व सर्जक पदर
उलगडतात आकाशावर

सर्व साखळदंड जसेच्या तसे
असून .....

**-चं.प्र.देशपांडे**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## मला जमायला हवं होतं गणित

जिवंत असते आई
ती मरून गेल्याला किती वर्षं झाली तो आकडा
मला आठवत नसला तरीही
ती किती वर्षं जगली हेही मला आठवत नाही
जगली होती की नाही हेही
नाहीच आठवत

मी आईवर लिहिली नाही कधी कविता
लिहिणारही नाही कधीच कदाचित
वडलांवर भावावर बहिणीवर
आजीआजोबामामामावशीवर
देखीलपण मरून गेली की वेगळीच दिसतात माणसं
वेगळीच कळतात

एकदा गर्भपातानंतर नर्सने नेले होते ट्रेमध्ये भरून
रक्ताळलेले मांसाचे तुकडे
कोरड्या पांढऱ्यातला लालओला रंग
त्याचा अर्थ काय होता?

काय अर्थ असतो राखेचा? मातीचा?

मागच्या महिन्यात आम्ही सत्तावीस होतो
आता पाच राहिलो
असं बोटांच्या पेरावर मोजून सांगते सेनाबाई
नक्षल्यांनी तोडलीत तिची माणसं
जिवंतपणी व मेल्यावरही
मला मोजता येत नाहीत आकडे
तिच्यासारखे
किती दंगली झाल्या किती हिंसाचार
किती माणसं कापली किती जाळली
किती पुरली जिवंत
आकडे आठवत नाहीत

मला जमायला हवं होतं गणित
कविता लिहिता येण्यापेक्षा
जमत नाही
किती वर्षं झाली तरी.

**-कविता महाजन**

## मग डोळे मिटून घेणंही

मग डोळे मिटून घेणंही
पाहात राहाणंच असतं
निरोपाच्या कटाक्षात
परतणीचं रोप उगवू लागलेलं असतं

शहराची शतकं पायाशी विस्कळून पडतात
मकबऱ्यांच्या मीनारांतून आर्त आळवणीची अजान
उमटते
इतिहासाचा दिल्लीदरवाजा उघडतो
रात्रभर काफिला सरत नाही
अर्ध्या उघड्या दारातून येणारी तिरिप
झोप न येण्याचा बहाणा होते

गाडल्या गेलेल्या नाळेतलं चुंबक खेचत राहतं
शरीरातल्या होकायंत्राचा काटा
गावाच्या दिशेनं
डोळे मिटून घेऊन टांग्यातून सवारीहोते
अशा गावातून जे कोणत्या शतकात होतं
याचा पत्ता लागत नाही

पण डोळे मिटून पाहाणं तिथं पोहचणं असतं.

**-गणेश विसपुते**

**भ्रम**

शेतात खपलो रात्री तेही आठवेना कुणाच्या कि कुठल्या क्षणी हि आली मुठीत माती ? बाळमुठ कोवळी माझी मला विषारी जन्मलो : दुधारी हा अर्थ उमजेना . उगीच प्रश्न आणि त्यांची भंपक उत्तरे उशाला ? सापडले काहीच नाही त्यांची गणती कशाला ? हि उषा उशाशी उसासे सोडते आहे मी भिक मागू कोणत्या वास्तवाला ? भासांचा भोवरा मी मानला सत्य जेव्हा .... जेव्हा सांगू कुणाला हा भ्रम होता .... तदन्त खोटा ?

**-गणेश दिघे**

## जुगलबंदी

त्याचा एकुलता एक जगावेगळा राग
तार अन् अतितार सप्तकातच विस्तारणारा
कायम केवळ द्रुत लयीतला
फक्त दोनच स्वरांचा ............
षड्ज आणि पंचम.... अचल, अविचल स्वर
आपल्या जागी ठाम !
[मी म्हणेन ती पूर्व]

तिच्या रागमालेत मात्र
नेमके हेच अचल स्वर वर्ज्य!
तिचे स्वर बहुशः कोमल, क्वचितच तीव्र
तळयात-मळयात, दबलेले गळयात!
मंद्र सप्तकातच घुटमळणाऱ्या तिच्या बंदिशी
क्वचितच मध्यात मध्यमाला स्पर्श करणाऱ्या
मध्यमातून सुरू होत मध्यमात संपणाऱ्या
मध्यम.......तिचा स्वर, पाचवीला पुजलेला

ग्रह, न्यास, विस्तार सारं काही मध्यम!
[हो, चालेल मला]

काही केल्या
त्याचे स्वर उतरत नाहीत, तिचे स्वर चढत नाहीत
बेसूर, भेसूर मैफल नुसती!

कशा जुळतील त्यांच्या तारा?
कधी रंगेल सुरेल जुगलबंदी?
अधल्या-मधल्या सुरांचा सनातन,
निरुत्तर करणारा प्रश्न ...........
सोडवायचा
की .............
सोडून द्यायचा?
**-क्रांति**

# शहर काही कविता

१

रस्त्याने धावत राहतो मी
एका शहराला कंटाळून
आणि पोहचतो दुस-या नव्या शहरात !

पण भेटते,पहिलेच शहर
डोळा चुकवून पळून गेलेल्या कैद्याला
अचानक जेलरने गाठावे तसे !

आगतिक थकव्याने
मी शोधू पाहतो
दोन हात जागा
हिरव्या झाडाखाली
सावलीत टेकण्यासाठी !

आपल्याच नखांनी उकरुन
आपल्या अंगाखालची माती,
फुफाट्यात गारवा शोधत पडलेल्या कुत्र्याला
धोंडा घालून हुसकावे तसे
हुसकावते हे ही शहर

साहित्य संस्कृती

आणि मी धावत राहतो

पुन्हा नव्या शहराकडे

जिथे डोईवर असेल

गर्भार आभाळाचे छत ...!

२.

कुठून सुरु होते ?

कुठे संपते हे शहर ?

रक्तवाहिन्यांच्या जाळ्यांसारखे पसरलेले

निर्जिव रस्त्यांचे दोरखंड

जिकडे तिकडे !

रस्त्याला रस्ते

रस्त्याला पुन्हा रस्ते !

कोणता रस्ता जोडला आहे,

कोणत्या रस्त्याला ?

गुंता सुटला सुटला म्हणेतो

अवाढव्य होतो आहे रस्त्यांचा पसारा !

शहराला जमिनीखालून रस्ते

शहराला हवेतून रस्ते !

एवढ्या सा-या रस्त्यांनी

शहराला जायचे आहे कुठे ?

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

की,

स्वतःच्याच कचाट्यातून सुटण्यासाठी
आगतिक तगमगीने
शहर शोधते आहे
नवा हमरस्ता ?

कुणी सांगावे
उद्या एखाद्या भल्या पहाटे उठावे
तर शहरच नसेल जाग्यावर !
कोण जाणे कुठे ?
निघून गेले असेल शहर
भुयारी रस्त्यांनी आणि

उड्डाणे घेत धावणा-या
फ्लाय ओवर्सनी ...!

३.

जंगल तोडून
टेकड्या कापून

झाडं पाडून
वाळू विटा सिमेंटचा संसार मांडताना

शहरानं धाब्यावर बसवलं
सारं 'वास्तुशास्त्र' (?)

आता...
मध्यरात्रीच काय
भर दिवसाही
शहराला होतात भास
जंगल वस्तीला आल्याचे !

चौकाचौकात शहराला
वेडावते जंगल
हिंस्त्र श्वापदे ठोकतात आरोळी...!

शहर भर माध्यान्ही होते हॅंग ...

ॲण्टी व्हायरस पॅक

एक्सपायरी पूर्वीच मोडीत निघाल्यासारखे ...!

**-प्रदीप आवटे**

## तुला कसे सगळे कळते?

कोण कुठे कुठल्या झाडाखाली
काय करीत बसलं  असेल,
पक्कं पक्कं माहित आहे
आत्ता आत्ता , या क्षणी !

काही बदललंच नसेल, सगळं तसंच असेल,
असली खुळचट कल्पना नाही!
पण काय करू ,
ऋतू बदलला कि,
त्या झाडांवरचे पक्षी इथेच येतात,
नका बाबांनो म्हटलं तरी
तिथल्या सगळ्या कहाण्या सांगून जातात!

**-शिवकन्या देशपांडे**

## हत्याकांड

काल रात्री,

अंधारलेल्या गल्लीत गाठून

काही शब्दांना

गळा घोटून ठार मारलं मी.

स्साले, वाक्यांची जुळवाजुळव करून

मला कोप-यात घेरण्याच्या प्रयत्नात होते.

आज, कदाचित,

मला शांतनिवांत झोप लागेल.

**-बालाजी सुतार**

## स्वप्न-सेतू.

नुसते डोळे बंद करायचे म्हटलं तरी
स्वप्नं सेतू बांधायला घेतात
त्या तीरांच्या निजऱ्या राती
इकडे सोपवायला बघतात..

पायवाटांना खो घालून
रस्ते छापायला बघतात
गावच्या गावं उलगडून
शहरं रुजवायला बघतात
संन्यस्त झाडांना गुंगवून
आकाश पळवायला बघतात

मात्र एकुणातच मी
हृदय जागं ठेवून
मेंदूला झोपवते,पापण्या जोजावून

स्वप्नांना हुलकावणी देते

आणि वेडी स्वप्नं

स्वप्नं बघत बसतात

माझ्या स्वप्नात येण्याची

**-चैताली आहेर.**

## शिवजयंती

excuse me ...मला थोडंसं बोलायचं होतं
तुमच्याशी..बोलू ना?

अभिमानाने फुगलेली  छाती...तुम्ही
भूमीसाठी समर्पण....तुम्ही
सामान्यांना नागवणार्यासाठी वाघनखं....तुम्ही
दुष्काळ असून शेतकर्याला दिलेला दिलासा...तुम्ही
कुलीन स्त्री च्या अब्रूचे रक्षणकर्ते...तुम्ही
तळागाळातल्या अशक्त माणसाच्या मागे उभे
कणखर....तुम्ही
धर्माच्या पल्याड जाऊन न्यायासाठी झटणारे...तुम्ही
रयतेच्या पै न पै चे राखणदार...तुम्ही
ज्याच्यासाठी जीव कुर्बान करून टाकला अनेकांनी
असे....तुम्ही

पण आता

धर्माच्या नावानं दुकान थाटण्यासाठी हुकुमाच
पान...तुम्ही

भल्या मोठ्या flex वर मग्रूर,दारूबाज,रंडीबाज आणि सोबत...तुम्ही

तुमच्या नावाचे पक्ष,संघटना,ब्रिगेड काढून सर्रास कत्तल करणारे आणि त्यांच्या पक्षाच्या नावात.....तुम्ही

धर्मात वाटणी कारून आता तुम्हाला जातीच्या चौकटीत ठोकणारे म्हणतात त्यांचे मूळ पुरुष....तुम्ही

DJ,गोंगाट,दारुडे,गर्दुल्ले यांच्या घोळक्यात अडकलेले.....तुम्ही

स्वतःच्या सोयीने दोन दोन वेळा ज्यांना जन्माला घालतात ते ...तुम्ही

भगवा,तलवार,घोषणा,टिळा,भीती.......तुम्ही

मराठा,बहुजन,दलित,आरक्षण....तुम्ही

इतिहास,ब्राह्मण,मुसलमान,धर्म...तुम्ही

शूरवीर,महापुरुष आणि नंतर देव...तुम्ही

आता खूप जपून भीत भीत बोलायचा विषय...तुम्ही

कधी आणि कसे बदलले हे संदर्भ सांगाल का...तुम्ही ?

**-राहुल वसंत दिकोंडा**

## मी पाहिलं उन्हाला

काही दिवसांपासून
बघतीये उन्हाला
जरा जास्तच
अस्वस्थ झालेलं
भर दुपारी दिसलं ते
पिंपळाच्या जाळीतून
रस्त्याकडे बघताना ....
शोधक नजरेने.....
खाली पारावरच्या
मुंग्याच्या ओळीत
ते उगीच शिरू पाहत होतं .....
त्याच्या डोळयातला अश्रू
कसा लख्ख गेला चमकून
काय होतं बिनसलं ?
थकलं असावं
स्वतःचा चटका सहन करून ....

तेव्हाच वातावरण
सावळं झालं

नदीच्या काठावर होरपळलेल्या

उन्हाला

सावलीच्या कुशीत शिरताना
मी पाहिलं
हळवं होऊन ....

**- अभिरुची**

## एक नातं

एक नातं

अजून श्वास घेत असताना

कचकन मोडून

पुरलं तेंव्हा

त्याच्या अधूर्या श्वासांनी

खचत गेले

माझे उरले श्वास

एक नातं

अजून श्वास घेत असताना

कचकन मोडून

तोडलं

तेंव्हा

मरून गेलं माझ्यातलं
काही आत

**~ जुई कुलकर्णी**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## चिरदाह

आणि.....

नाकाशी पोहोचलं पाणी.
उरीपोटी जपलेलं
डोक्यावर घेतलेलं
तत्वांचं पिलू
झपकन् कधी पायाखाली आलं
नाहीच कळलं.

म्हणजे आता अश्वत्थाम्याबरोबर
माकडीणही फिरणार की काय आता
चिरदाह घेऊन
चिरकाल..............

**-संध्या सोमण**

## काळजातली दारूभट्टी

आई गुत्त्याची मालकीण आणि बाप तिचं बोहाणीचं पाहिलं गिऱ्हाईक जसा जसा फुल्टू व्हायचा आणि शिव्या द्यायचा बाप

तशी तशी आईलाच चढायची जगण्याची नशा झिंगून पडलेल्या बापापेक्षा दारू ठेवलेल्या केंडालाच आई जीवापाड का जपायची हे तेव्हा कधीच कळले नाही

आत्ता सगळं कळतंय मला श्वास घेता यावा म्हणून तिचं मळीतल्या वासात गुदमरणं तळतळाटीचं जगणं जिव्हारी लागू नये म्हणून आतल्या आत जळत राहणं आठवतंय आता

पण सुगंधी वाटतं तिच्या अंगावरच्या मळाचं काळजावर आधान येतं आंबलेल्या डोळ्यातून निर्मळ पाणी उतू जातं .........

ग्लास भरून देताना जेव्हा तिच्या हाताला लागायचे खूप जणांचे हात तेव्हा रक्तातच अल्कोहोलचा भपका उडायचा मनाचा कोळसा व्हायचा पण तिच्या थंड फडक्याखाली जळता आलं नाही

गळायचं होतं गरम नळीतून तिनं गळू दिलं नाही
हरामखोरीला रक्तातून केव्हा उर्ध्वपातीत केलं कळू दिलं
नाही कसं विसरू सरमाडी विकणाऱ्या आईनं
बालपणाच्या गुळमट रसायनात तिच्या दळीन्द्रिच्या
नवसागारेचा एकही कण पडू दिला नाही

दुःखाच्या कैवल्याचा कैफही चढू दिला नाही माझ्याही
आईच्या मनात उभी बाटली आडवी करायची खूप खूप
इच्छा होती पण पूर्ण झाली नाही ती स्वतः उध्वस्त
झाली पण जन्माची दारूभट्टी तिला उध्वस्त करता
आली नाही.

**-भरत दौंडकर**

## देअर्स द रब

दगड माती नद्या डोंगर कधीपासून आहेत?

कधीपर्यँत असतील?

कधीपासून आहे मी ?

माझ्यातला आकाशाने झाकलेल्या या जमीनीवर
कधीपर्यँत करु आपण श्वाशोच्छवास

कुठे निश्चित असेल आपली जागा हक्काची?

कुठे मी असेल सेँद्रीय

किती टिकतील हे पोकळ शब्द?

ह्या पोखरलेल्या भिँती अन निनावी ओरखडे ,

का उठून येत नाही कुणी अंगावर जीव घेण्यासाठी ,

कधीपर्यँत ओढणार हा संभ्रम ?

कुठे गेले सगळे धातू शरीरातून अचानक ?

छाती फोडणारी तुतारी आता उठत का नाही?

साली ही कुठली मिती जीवनाची

का जाणवत नाही मी इथे ?

मी आहे की नाही च्यामायला ..

**- प्रेषित**

## सिल्विया

सिल्विया प्लाथनं

आत्महत्या केली नाही

फक्त फेकून दिला
देह
आत्म्याआड येणारा

रक्त , मांस , पेशीत

बंदिस्त होऊ शकत नाही
सिल्विया

तिचा संसार युगांचा

आजही एखादा श्वास हेरते
आत शिरते
खाऊन टाकते
तिथल्या पुरूषांना

सिल्विया

ओह सिल्विया !

**- योजना यादव**

**मनीषा ......**

नवे वर्ष ,नवे पर्व

नवे क्षितीज ,नवी प्रभा

द्या मनास नवी उभारी ......

नवे स्वप्न,नवी आशा

घ्या  उंच गगन भरारी.....

नवे ध्यास,नवी दिशा

ठेवा मन निर्भय करारी .....

नवे प्रश्न ,नवी आव्हाने

समर्थ पेला सक्षम बाहुंवरी ......

नवे धेय्य ,नवे उदिष्ट

गाठण्या मार्ग क्रमा

घेउनि  श्रम सर्वतोपरी .....

टाळा प्रलोभने ,बाळगा संयम

वागू नका अविचारी .....

राखा मनी विवेक

होऊ नका व्यसनी,विकारी .....

देऊ नका दुक्ख कुणा
लागेल असे जिव्हारी ....
विसरू नकाच केंव्हा
आहे हा देह नश्वरी.....
बहरू दे वसंत
सदा  आयुष्यभरी
हीच आस असे
मनीची अंतरी ....
उमटू दे जीवनी सदा
रंगछटा  फुलपाखरी
करिते ही मनीषा
माझिया मन्वन्तरि....
असो सदैव कृपा
तुम्हावरी परमेश्वरी
हेच प्रार्थिते त्रिवार
चरणी या मातेश्वरी .....

**-सौ.वर्षा किडे-कुळकर्णी**

## गुन्हा

हल्ली जुन्या कविता
वाचताना वाटत
आपण किती क्रूर वागलो
ह्या साऱ्या कल्पनांशी.
किती सहज चिरडून टाकले
त्यांना शब्दात ...
आणि निर्माण केली
ही आखीवरेखीव  थडगी.
आता आठवत ही नाही
त्यांचा नक्की गुन्हा काय होता..

## चक्र

विचारांच चक्र एकदा सुरू झालं की
ते कुठे जाऊन थांबेल हे सांगता येत नाही
आणि गंमत म्हणजे ते कशानं सुरू होईल
हे ही कोणाला जाणता येत नाही ...

**-अनिरुद्ध अभ्यंकर**

## विजयादशमी शुभचिंतन

सीमा म्हणजे मर्यादा
हितचिंतकाने घालून दिलेली
ती राखणे हे सीतेचे काम.
ती ओलांडणे
म्हणजे घात करून घेणे
हेच मनावर ठसलेले.
रामाने मात्र करायचे सीमोल्लंघन
समुद्रापार जायचे
सीतेला परत आणायचे
त्याचे संस्मरण दस-याला सोने लुटून करायचे

वीरांचे सीमोल्लंघन
वीरांगनांनी मात्र मर्यादापालन
या परंपरेच्या सीमेलाच
ओलांडून जावे आता
ज्याने त्याने जिने तिने स्वत:च्याच
मर्यादांना ओलांडून
सीमोल्लंघनाची नवी असीम वाट चालावी.
कधी बरोबरीने, कधी एकट्याने,

पण सदैव समाधानाने,
आणि करावी खरोखरीची
विजयादशमी.

- **विद्द्युल्लेखा अकलूजकर**

## मौनमुद्रा

-आणि

अकस्मात हसता हसता नकळत

अनावधानाने,

माझा

ढका लागून ,

तो शुभ्र नितळ हास्याचा
मुखवटा निखळला तिचा....!
आणिअनादी काळाची
मुकी वेदना दिसली...

पापण्यांवर गोठून गेलेली

वसंत प्रतीक्षा ....
किणकिण हिरव्या स्वप्नांची
पिचलेली बिल्वरे....
आणि खूप खूप बोलू पहाणारे डोळे....
वेडावणा-या अस्मानी नक्षत्राची गाणी..
विसरलेलेओठ...
बघत राहिले अनिमिष...!

.

धडपडून तिने पुन्हा मुखवटा शोधला
पुन्हानिट चेह-याला सारखा
करूनघेतला....!

.

आता चारचौघात , ती
तेचशुभ्र नितळ हसते तेव्हा
तिची मौनमुद्रा
मलाअधिक छळते....
आणि ती मला बेमालूम टाळते.....!

**-चंद्रमाधवी.**

साहित्य संस्कृती

## शाश्वती

पुन्हा दिसायला लागली आहेत
वादळाची चिन्हे!

वादळ ओसरेल तेव्हा
दिशा स्वच्छ होतील आपोआप!
पण थकलेपणात उमेद फुंकून पुन्हा
नवीन सुरूवात करायची वेळ येईल तेव्हा
सोबत हवी असेल...

वादळ-पाउस-वारे संपून
झगमगती वाट येईल पुढ्यात
तेव्हा दिपलेले डोळे उघडतील
असा आवाज हवा असेल

पुन्हा उजेडाचा लखलखाटही कधीतरी संपेलच
आणि कधीकाळी अंधाराला सरावलेले डोळे मात्र
पुढ्यातला अंधार बघू शकणार नाहीत
तेव्हा चिरंतन प्रकाश होऊन आत तेजाळणारं
कुणीतरी हवं असेल...

तू असशील तिथपर्यंत?

मग आत्ताच्या वादळालाही
मी उघड्यावर जाऊन भिडेन म्हणतोय...

**- नचिकेत जोशी**

संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## एखादी कविता

हातातलं सौख्य
सुखाचं कौमार्य
सबंध बालपण
एखादी कविता...

झरझर आसवे
क्वचितच नजर
भिंतींचं सख्य
एखादी कविता...

तुझेही डोळे
शिल्लक थोडे
सुटं सुटं अवसान
एखादी कविता...

चंद्र मोकळा
निःसंग जोगवा
अंधार एकटा
एखादी कविता...

आर्त कुणाचे
मूल धडपडे
स्वदेह रडे
एखादी कविता...

अर्थ वादळ
नातं निरंतर
ओझ्याशी बोलताना
एखादी कविता...

**-उत्पल व.बा.**

## तुझे संपलेले दुःख

1

तुझ्याकडे आहे
गत काळातल्या दुःखाची दुर्बिण
तु पाहतोस त्या भिंगातुन
गिरकी घेणार्या आयुष्यकडे
भ्रमणाच्या गती चुकत नाहीत
सम सापडते तुला जगण्याची
गत काळातले दुःख
जणु बाळकडू होते
गात राहतोस तू जन्मभर
तीच बडबडगीते
दुःख सहन कर दुःख भजन कर
पाठ होतात पाढे
दुःख एक्के दुःख ,दुःख दुणे दुःख

2

साहित्य संस्कृती
संस्कृती कला जाणिवा जोडणारा सेतू

तुझे दुःखाशी नाते होते
माझे तुझ्याशी
तुझे दुःख संपले
तुझे देहमन पैलतीराशी
मी उराशी कवटाळत राहते
तुझे संपलेले दुःख

3

दुःखाला काळ नाही मन नाही
अनादि आहे अथवा पुनः पुनःजन्मणारे
पाषाणाच्या प्रज्ञेप्रमाणे

**- कविता मोकाशी**

## निरंजनाची कविता

*झोप येईना येईना, कविता सुचली निरंजना |*

*शब्दापुढे रचणे शब्द,हाचि लागला तया नाद|*

*निरंजनाचा कपडा भगवा, आत निरंजन रे नागवा ||*

कौतुक, स्तुती, वाद- विवाद, उपेक्षा आणि अपेक्षा ह्याहीपलिकडे जाणाऱ्या शाश्वत परिमाणाशी नातं जोडू शकणारी रॉय किणीकरांची कविता.

गहिऱ्या चिंतनशीलतेशी नातं सांगणारी, अचूक मोजक्या शब्दांच्या सहाय्याने विलक्षण असा कायमस्वरुपी असर मनावर टाकणारी आणि मनाला चुटपूट लावणारी. काही उमजलं आहे, समजलं आहे ही जाणीव होता होता, पाऱ्यासारखा निसटून गेला, अशा अर्थांची काहीशी अनुभूती देणारी, गूढ आणि तितकीच मोहिनी घालणारी समर्थ शब्दकळा ल्यायलेली पण काहीशी अस्थिर वाटणारी. वाचता, वाचता प्रत्येक शब्दामागे अस्वस्थ करुन सोडणारी.तिच्याकडे

आयुष्याची एक कणवयुक्त, समंजस अशी समज आहे. अबोल अशी सहनशीलता आहे, तिला ठाऊक आहे की,

*हा मार्ग कठीण पण आहे रे कनवाळू*
*जरी पायाखाली रुते जराशी वाळू..*

एक भंगलेपणाचा, उद्धवस्त आणि तरीही खानदानी असा भाव आपल्यास भोवताली लपेटून ही कविता आपल्याच नादात शब्दांच्या आधाराने वावरते, आणि तरीही शब्दांच्या पलिकडे काही अव्यक्त खेद, रुखरुख उराशी जपते.

*काजळरेखेवर लिहिले गेले काही*
*मौनाची फुटली अधरावरती शाई..*

खेद, विषाद आणि त्यातूनही कधीतरी हळूच डोकावणारा, आयुष्यासंबंधीच्या प्रगल्भ आणि मनस्वी अशा चिंतनातून निर्माण झालेला, स्नेहशील, तरीही थोड्याश्या उदासपणाची झालर असलेला असा मिश्किल भाव ल्यायलेली अशी ही कविता.

जीवनातल्या विसंगतींवर, मानभावीपणावर आणि एकूणच आयुष्याच्या क्षणभंगुरतेवर एक प्रकारच्या उदासीन, अलिप्त वृत्तीने भाष्य करणारी. कशाला काही शोधायचे? तिला कसलीच अपेक्षा नाही, आशा नाही. सारे काही शेवटी लय पावणार आहे ह्याची एक पक्की खूणगाठ तिने बांधली आहे, पण तरीही तिच्या वेदनेमध्येच तिच्या बेहोषीची धुंदीदेखील आहे.

*बघ चाफा सुकला मावळला तो गंध*
*दे सोडून वेड्या शोधायाचा छंद..*

ह्या कविता म्हणजे जणू विविध रंगाचे फटकारे. कधी जमलेले, कधी विस्कटलेले, पण तरीही अंगभूत सौंदर्यामुळे ल़क्ष वेधून घेणारे. एकटेपणाची, मृत्यूची जाणीव झालेली आणि व्यवहारी मानभावीपणाचा उबग आलेली आणि त्या अनुभवांबद्दल कडवट भाष्य करणारी ही कविता. आयुष्य जगताना आलेल्या अनुभवांतून, पाहिलेल्या विसंगती आणि सर्वच बऱ्या वाईट अनुभवांच्या जाणिवा सोबतीला घेऊन आपल्या आयुष्याचा जमाखर्च शब्दकळेतून मांडायला बसलेली आणि तरीही 'लिहिशील किती रे, स्पंदनक्षण श्वासांचे' हे

भान बाळगणारीदेखील हीच कविता. तिला मौनाचे सौंदर्य उमजले आहे, मौनातले अर्थ ती उमगून गेली आहे आणि शब्दांचे क्षणभंगुरत्वदेखील.

*अर्थाला असते बंधन का शब्दांचे*
*कोसळून पडले इमले अक्षरतेचे..*

कधीकधी उत्तररात्र वाचताना वाटते, तत्वज्ञान, विज्ञान वा अजून काही, ही कविता काय शोधते आहे? जीवनाचा अर्थ? स्वतःचे अस्तित्व? हरवलेले, शाश्वत असे- निदान तसे भासणारे तरी, प्रेम? गर्दीतही आपला एकलेपणा जपणारी आणि एका विलक्षण धुंदीत त्या एकलेपणाचे सतत राखलेले भान मिरवणारी ही कविता. तिचे प्रेमही असेच आधे- अधुरे, धुंद आहे! सापडता, सापडता कधीतरी हरवलेले, हाती येता येता सुटलेले आणि एका वळणावर जणू मनातल्या सर्व मुलायम, मृदू भावना, संवेदना जपत तसेच गोंधळून दिशाहीन भिरभिरलेले... हाती गवसले नसले तरी तिचे प्रेमाशी राखलेले इमान सुटलेले नाही.

जे दिसते नसूनी, असूनी दिसले नाही,
अंगाई गाते दिक्कालाची आई..

असे सारे मनातले व्यापताप सहन करुनही मस्त कलंदर असणारी ही कविता. तिच्यापाशी भोग आहे, त्यागही आहे. आसक्तीही आहे आणि वैराग्यही आहे. असह्य अविनाशी वेदनाही आहे आणि समंजस वृत्तीने आलेली निवृत्त वृत्तीही आहे. आता तिला कसलीच वांछा उरलेली नाही. तिच्या मनाची वेदना कोणालाच समजू शकत नाही हे तिचे आर्त तिने आता पक्के स्वीकारुन आपल्य मनाशीच बांधून घेतले आहे. तिचे आयुष्य जगली आहे, तिचे लढे तिने पेलले आहेत आणि पराभवही स्वीकारून पचवले आहेत. आता तिला लागले आहेत ते परतीचे वेध, पण तिची तक्रार नाही, सारे हलाहल पचवूनही आयुष्याच्या सुंदरतेवर तिचा चिरविश्वास आहे, लोभ आहे.

तिचे शेवटचे मागणेही अबोल. आर्जवी. आता मिटायचे तर आहे, पण कसे?

*ये मिटूनी जाऊ दंश जोवरी ओला,*
*मृद्गंध पांघरुन घेऊ चंद्र उशाला..*

इतकी स्वप्नवत चिरनिद्रा भंग करण्याचे धारिष्ट्य कोणी करील तरी कसे?

**-शैलजा रेगे**

संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## कवी सुधीर ..

कवी सुधीर मोघे यांच्यावरचे हे माझे खरं तर दुसरे लिखाण. या आधीचे आणि हे, दोन्हीत एक समान सूत्र आहे आणि काही असमान धागे.
समान असे .. की या दोन्हींत त्यांची ’जीवनी’ अशी नाही. किती पुस्तके लिहिली? कोणते पुरस्कार मिळाले? यात ते अडकलेलं नाही. पण,

पहिलं ..

त्यांच्या निधनाच्या दुसऱ्याच दिवशी लिहिलेलं.. त्यामुळे उत्स्फूर्त आणि काहिसं अचानक आलेल्या पोरकेपणाने बावरून गेल्यासारखं.. तरी त्यांना वाहिलेली आदरांजली.

दुसरे आजचे ..

. त्यांच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांनी लिहिलेलं... भावनेच्या पगड्याच्या थोडं बाहेर येत.

त्यांच्या कविता-गाण्यांचे अवलोकन करण्याची किंवा त्यांची साहित्यिक मिमांसा करण्याची माझी योग्यता नाही. ’आठवणीतली गाणी’ या माझ्या उपक्रमामुळे त्यांच्या गीतलेखनात दिसलेले सुधीरजी आणि आमच्या

सात-आठ वर्षांच्या ओळखीतून दिसलेले काव्याबाहेरचे सुधीरजी...यांच्याशी झालेल्या चर्चांतून माझे काव्यानुभव समृद्ध झाले आणि मराठी भाषेच्या ज्ञानाची कक्षा रुंदावत गेली.

अलीकडचे प्रसिद्ध कवी वैभव जोशी त्यांच्या एका कवितेत म्हणतात,

'रे छळू नका रे त्याला का नवे न काही स्फुरते

एखाद्या आयुष्याला एखादी कविता पुरते.. '

पण जर कुणाला अशी 'एखादी'च नाही .. तर अशा अनेक 'कविता पानोपानी' सुचल्या असतील तर.. त्यांना काय म्हणावे? कविवर्य, कविश्रेष्ठ? आणि त्याही पुढे जाऊन.. ते जर फक्त शब्दचित्रेच नाही तर रंगचित्रे, संगीत दिग्दर्शन, रंगमंचीय सादरीकरण, पटकथालेखन .. असंही बरंच काही करत असतील तर?

सुधीर मोघे यांना मात्र त्यांची 'कवी सुधीर' अशी सुटसुटीत ओळख करून दिलेली अधिक आवडायची. 'Poet Sudheer' अशी झोकदार इंग्रजी सही ते करायचे. कारण कवितेव्यतिरिक्त इतर कुठल्याही

माध्यामातून व्यक्त होणं, हे त्यांच्या 'कवी' असण्याशी निगडीत आहे, असं त्यांना वाटायचं. त्यांच्याच शब्दांत सागायचं तर, "माझ्या प्रत्येक असण्याला माझ्या कवी / poet असण्याचा base आहे, संदर्भ आहे." आमच्या चर्चेत हे त्यांचं कवी असणं भरून असायचं.

टेरिकॉटची पॅंट, ढगळसा झब्बा .. अशी अनौपचारिक वेषभूषा. 'पद्मा फूड्स' हा तितक्याच अनौपचारिक गप्पांचा अनौपचारिक अड्डा. जवळपास पन्नास वर्षांची कारर्किर्द. सांगण्यासारखे प्रचंड काही आणि ते सांगता सांगता समोरच्याला जाणून घेण्याची खुबी ..

त्यांची कविता शब्दबंबाळ नाही. शैली मिताक्षरी. थोडक्यात आणि मार्मिक. बुद्धीवादी, तर्कनिष्ठ आणि त्याचवेळी तरल.. scientific temperची झलक असणारी. परमेश्वराच्या आस्तिक आणि नास्तिक, दोन्ही रूपांचं एकाच तन्मयतेने वर्णन करणारी.

शब्दांवर प्रेम करताना.. त्यांच्या आहारी न जाता. त्यांच्याकडे केवळ माध्यम म्हणून पाहताना, शब्दांविषयी ते म्हंटतात..

शब्दांच्या नकळत येती.. शब्दांच्या ओठी गाणी..
शब्दांच्या नकळत येते.. शब्दांच्या डोळा पाणी.
शब्दांना नसते दु:ख.. शब्दांना सुखही नसते..
ते वाहतात जे ओझे.. ते तुमचे माझे असते..

सुधीरजी एकदा म्हणाले होते, "मुकुंद (फणसळकर) म्हणतो, माझ्या प्रत्येक कवितेत-गाण्यात माझी सही असते. तुला वाटतं तसं?" त्यांचं काव्य-गीत लेखन जवळजवळ मुखोद्गत असल्याने मी लगेचच रुकार दिला. म्हंटलं, "हो. हो. नक्कीच.

'रात्रीस खेळ चाले' या गाण्यात जेव्हां तुम्ही लिहिता ..
'हा चंद्र ना स्वयंभू रवितेज वाहतो हा.. ग्रहणात सावल्यांचा अभिशाप भोगतो हा..'

'सांज ये गोकुळी' मध्ये .. 'पर्वतांची दिसे दूर रांग .. काजळाची जणू दाट रेघ',

'सूर कुठूनसे आले अवचि" मध्ये .. 'रूप स्वरांचे तरल.. अपार्थिव',

'सांज ये गोकुळी' मध्ये .. 'सूर्य जन्मता डोंगरी संगे जागल्या सावल्या",

’एकाच या जन्मीं जणू फिरुनी नवी जन्मेन मी’ .. या तुमच्या सह्याच तर आहेत."

मन .. या विषयावर सुधीरजींना खरं तर Ph.D. मिळायला हवी होती. एका कवितेत ते म्हणतात .. ’मन मनास उमगत नाही .. आधार कसा शोधावा ! .. ’चेहरा-मोहरा ह्याचा कुणि कधी पाहिला नाही .. धनि अस्तित्वाचा तरिही ह्याच्याविण दुसरा नाही.’ आणि असंही .. ’मना तुझे मनोगत मला कधी कळेल का ?” याच कवितेत ’मन’च कसं आपल्या भावविश्वावर नियंत्रण ठेवतं हे सांगताना, ’तुझ्यामधे सामावला वारा, काळोख, प्रकाश’. एका ठिकाणी .. ’मनाचिया घावांवरी मनाची फुंकर ..’ आणि 'मन' ते 'कविता' असा प्रवास ...

एकांत, लेखणी, कागद- वाया सारे

मन कागदाहुनी निरिच्छ अणि कोरे

गिरविता अहेतुक रेषांचे गुंडाळे

बोटांवर अवचित मन ओठंगुन आले.

सुरेश भट, शांता शेळके, कुसुमाग्रज यांच्यावर ’झी’ मराठीने केलेल्या ’नक्षत्रांचे देणे’ कार्यक्रमांचे लेखन

सुधीरजींनी केले आहे. एकदा त्यावर बोलत असताना, समोर बसल्याबसल्या त्यांनी संवादिनी घेतली. ती त्यांच्या खोलीत असायचीच .. आणि चक्क सुरेश भटांचं 'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझ्यात वेगळा' गायला लागले आणि म्हणाले, "देवकी (पंडीत) अंदाजे सतरा वर्षांची असताना मी तिला हे गाणं शिकवलं ते असं. तेव्हां कोवळया वयामुळे तिला गीताचा संपूर्ण अर्थ उमगलाच होता, असं म्हणता येणार नाही. ती, मी शिकवलेली चाल या लयीत म्हणायची. आता थोडी ठायमधे असते. पण हा 'तिचा' व्यक्त होण्याचा भाव आहे."

'लय' वरून आठवलं .

लय एक हुंगिली खोल खोल श्वासात,

ओवीत चाललो शब्दांच्या धाग्यात,

लहडला वेल... तो पहा निघाला गगनी,

देठांना फुटल्या - कविता पानोपानी

सुधीरजी म्हणायचे, "एकदा कविता लिहिली की तिचे

नशिब माझ्या हातात नसते. ती तिच्या मार्गाने जाते ..

मी माझ्या .."

एक कवी आपल्या कवितेकडे इतक्या निर्ममपणे तेंव्हाच पाहू शकतो जेव्हां कुठल्यातरी पातळीवर कवितालेखन हे त्याच्यासाठी ध्यानसाधनेसारखं असतं ..

मी ओंजळ माझी रितीच घेऊन आलो
जाताना- ओंजळ रितीच ठेवून गेलो
ओंजळीत आल्यागेल्या श्रेयांवरती;
पण पुसट.. कोवळे नाव ठेवुनी गेलो.
ह्या नि:शब्दांच्या आड कुजिते कसली?
पानांच्या रेषांतुनी भाकिते कुठली ?
होशील एकटा तू देहाच्या पैल
सोबतीस तेथे कविता फक्त असेल

आदरांजली

**-अलका विभास**

## सायलेंट मोडमधल्या कविता: नव्या जाणिवांची विचक्षण कविता

तंत्रज्ञानाने माणसाच्या आयुष्यात अनेक बदल घडवले. माहिती क्रांतीने अभ्यासाचा, संशोधनाचा वेग कमालीचा वाढला. इतर सुखसोयी नि आर्थिकदृष्ट्या अनेक बदल घडले. या बदलांच्या आर्थिक, व्यावहारिक परिणामांबरोबरच काही जाणिवा, इझम, काही संकेत आणि काही रूढी व्यवस्था नव्याने तपासून पहायला हव्यात याची जाणीव कवितेसह अन्य साहित्यातूनही दिसून येऊ लागली.

उत्पलची कविता हे जगण्याचे नवे संदर्भ घेऊन उभी आहे. परंतु ती निव्वळ संदर्भ नवे आणत जुन्याच जाणिवांच्या नव्या आवृत्त्या समोर मांडत नाही. तर मुद्द्यांपलिकडे जाऊन त्याबरोबर येणा-या जाणिवा साथीला घेऊन उभी राहताना दिसते. ढोबळमानाने पाहिले तर तिला सामाजिक जाणिवेची कविता म्हणता येईल, त्यात अधेमधे मार्क्सवादी जाणीव स्पष्टपणे दृग्गोचर होते. परंतु त्यातही स्वतःला पडताळून तपासून

पाहताना ती वैयक्तिकही होते. परंतु जुन्या काही चौकटींना, काही विचारव्यूहांना गैरलागू ठरवण्याइतपत आजचं सामाजिक वास्तव खरंच बदललं आहे का? समृद्धीच्या, नव्या व्यवस्थेच्या रेट्यामधे त्यात खरंच इतका मूलभूत बदल झालेला आहे का की ती पार्श्वभूमीच धूसर झालेली आहे किंवा नष्ट झालेली आहे? हे आणि असे प्रश्न नव्या-जुन्या जगण्याच्या चौकटींसंदर्भात उत्पल विचारतो आहे आणि त्यांच्या अनुषंगाने त्याच्या कवितेची वाटचाल होते आहे.

आजच्या आपल्या जगण्यातल्या अन्य व्यावहारिक भाषांच्या प्रभावाखाली असलेल्या संभाषणभाषेचाच वापर कवितेसाठी केला आहे. संदर्भाबरोबरच नव्या जाणिवा घेऊन उत्पलची कविता उभी राहिली आहे. जसे ती वापरून गुळगुळीत झालेल्या प्रतिमांना, विशेषणांना, कल्पनाविस्ताराला फाटा देते तशीच ती कोणतीही नवी परिभाषा अथवा प्रतिमासृष्टी निर्माण करत नाही. निव्वळ नोंदवत जाण्याच्या आणि त्यातल्या मथितार्थाकडे निव्वळ अंगुलिनिर्देश करण्याच्या साध्यासोप्या शैलीतूनही कविता परिणामकारक होते.

ही कविता असली तरी रुढार्थाने काव्य नाही. हिची पठडी तशी मुक्तच्छंदाला प्राधान्य देणार्या नवकवितेचीच. ही कविता प्रश्नांची आहे, अनुभवांची आहे तितकीच जाणिवेची नि विचारांचीही. भवतालाशी निगडीत असलेल्या आपल्या बंधांची, त्या भवतालातील घटकांप्रती आपल्या संबंधांविषयी, कार्यकारणभावाविषयी प्रश्न निर्माण करत त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न ती करते आहे, क्वचित निव्वळ साक्षीभावानेच जगल्याची खंतही ती व्यक्त करते आहे.

शाब्दिक मांडणीपलिकडे जाऊन अनुभूतीच्या पातळीवर नेणारी ही कविता आहे. या कवितांमध्ये 'अर्थामागुन शब्द' सहजपणे येताना दिसतो. 'स्वतःत गुंतून पडलेलं राजस सुख' तर कधी 'आकाशाकडे कढंत डोळयांनी पाहणारं दु:ख' असो (कविता-१, पृ. १९). तो कढंत हा शब्द इतका नेमका भाव दाखवतो की तुकड्यांची गोधडी होऊन पडलेल्या जमिनीवर बसून नितळ आकाशाकडे डोळे लावून बसलेला सुकल्या शरीराचा, भकास नजरेचा, हताश चेहर्याचा एखादा

अभागी शेतकरी चटकन डोळयासमोर उभा राहतो. याआधी सुखासाठी वापरलेले 'राजस' हे विशेषण हा विरोधाभास अधिकच टोकदार करून जाते.

'कधी कुणावर तुटून पडणारं जन्माचं निलाजरं सत्य' असं म्हणतो तेव्हा त्या दाहक अनुभूतीला किमान पण नेमक्या शब्दांचं कोंदण देऊन जातो.

दिवसेंदिवस आत्मकेंद्रित, लहानशा वर्तुळात बंदिस्त करत नेणार्या जगण्याला 'कवितेचा कागद' म्हणणे ही एक अपूर्व कल्पना आहे. या पाठोपाठ 'कागद आखडू दे, कविता नको' असे म्हणताना या जगण्याच्या आखूड होत चाललेल्या वर्तुळाने माझ्या जाणीवांचा विस्तारही आखूड होऊ नये अशी आशा तो व्यक्त करतो आहे. (कविता-२ पृ. २०) घोडा हे एक दु:ख पचवणार्या पण मूक राहणार्या जनतेचे दु:ख मांडणारे प्रतीक. भवताली जमणारे नि त्याच्या दु:खावर कोणताही उतारा न काढता निव्वळ चर्चाच करत बसणारे वीर हे आजच्या जगाचे एक प्रातिनिधिक चित्र बनून जातात.

संगणक हा आजच्या जगाच्या जवळजवळ दुसरा प्राणवायूच ठरू पाहतो आहे. ब्राऊजरच्या खिडकीतून जगाकडे पाहणारी आजची पिढी साहजिकच जगण्याचा विचारही त्या संदर्भात, त्या परिभाषेत करू लागली आहे. याचा सुरेख आविष्कार 'टॅबबाधा' या कवितेमधून उमटला आहे. ब्राउजर प्रमाणेच मल्टिटास्किंग (multi-tasking) हा आजच्या जगण्यातील अपरिहार्य भाग होऊ पाहतो आहे. एकरेषीय, एकदिश जगणे हळूहळू मागे पडते आहे. त्या बहु-आयामी जगण्याचे विपरीत परिणामही भेडसावू लागले आहेत. या सार्यांची जाणीव करून देताना उत्पलने याला 'टॅबबाधा' असा विलक्षण समर्पक शब्द वापरला आहे.

टेलिविजन नावाच्या क्रांतिकारी उपकरणाने अनेकांना एकाच वेळी एकाच कार्यक्रमाचा, सादरीकरणाचा आस्वाद घेता येऊ लागला. त्यातून उमटणार्या संवाद-चित्रांतून काही तुमच्या आमच्या जगण्यातही रुजू लागले. संस्कार, वारसा आणि शिक्षण या पलिकडे जगण्याला आकार देणारे, किमान त्याचे एक प्रतिबिंब

दाखवणारे एक माध्यम माणसाच्या हाती लागले. 'फ्रेंडस' ही एक प्रसिद्ध मालिका. यातून अर्वाचीन अमेरिकेतील तरुण पिढीचे जगणे, विशेषतः त्यांचे कौटुंबिक, लैंगिक आधार, त्यासंबंधीचे दृष्टीकोन यावर मार्मिक भाष्य केले गेले आहे. उत्पलच्या विचक्षण दृष्टीने या 'फ्रेंडस'च्या जगण्याला भारतीय जगण्याच्या शेजारी आणून उभे केले आहे. त्यातून 'टु द फ्रेंड्स' नावाची एक विलक्षण धारदार दीर्घकविता आकाराला आली आहे.. 'काल्पनिक असले तरी प्रातिनिधिक आहेत' हे बजावतानाच त्या पार्श्वभूमीवर इथे काय सापडते हे तपासताना तो 'या भूमीत सहजीवन मेलं, लग्न टिकून राहिलं' हे वास्तव नोंदवून जातो. "या भूमीने अध्यात्म सांगितलं | आणि विधवांना जाळलं'|" किंवा 'या भूमीने विचार दिले | आणि विचारांना अग्नीही दिला..." असा या भूमीपुत्रांच्या वर्तनातील विरोधाभास दाखवतो आणि त्याच वेळी "या भूमीत संशोधन फुटकळ होत गेलं | आणि संशोधनाचा उपभोग घेणारे वाढत गेले | या भूमीत आयफोन अवतरले | तेव्हा स्क्रीनसेवर म्हणून

बुवा-महाराज अवतरले|" असं या त्यांचं नवतेला स्वार्थापुरतेच जवळ करत भूतकाळाच्या, परावलंबित्वाच्या कर्दमातले रुतलेपणही.

ही कविता कवितेच्या पारंपारिक चौकटी, संकेत मोडू पाहते. शृंगारालाही मागे सारत ती संभोगाबद्दल थेट भाष्य करते. त्याही पुढे जाऊन त्या संभोगालाच चरितार्थाचे साधन बनवून त्याला देहव्यापाराच्या पातळीवर आणून बसवणा-या जगण्याबद्दलही बोलते. उत्पलची कविता त्या जगातल्या स्त्रियांबद्दल बोलताना, त्याचे विविध आयाम तपासताना ती अडखळत, चाचरत हातचे राखून तर बोलत नाहीच पण चौकटी तोडण्याच्या कोणत्याही नेमक्या दृष्टिकोनाशिवाय उमटणा-या निव्वळ अभिनिवेशी, विद्रोही वा विध्वंसाची होऊन रहात नाही हे महत्त्वाचे आहे. जाणिवेचे नि विचाराचे अस्तर घेऊन ती उभी आहे.

देहव्यापार करणार्या स्त्रियांच्या नजरेला नजर देत

त्यांच्यातील माणूस, त्यांच्या जाणीवा जाणून घेण्याचा प्रयत्न उत्पल करतो आहे. त्या रोकठोक व्यवहारासमयीदेखील मनात धडका देणारा मार्क्स, फेमिनिजम आणि मुख्य म्हणजे गांधी यांच्या प्रयत्नांतून एका लख्ख क्षणी त्या उपभोग्य वस्तूमागचं दिसलेलं हाडामासाचं माणूस, त्याच्या जाणीवेचे तिच्याही मनात उमटलेले प्रतिबिंब म्हणजे 'अवस्था' ही कविता. त्याच माणसाचे एक स्त्री म्हणून आसुसलेपण, लहानग्या प्रती दिसलेली आणि निव्वळ साक्षीभावानेच अनुभवता येणारी ती ओढ 'खूप लोक' मधून मांडली जाते तर 'सवाष्ण' आणि 'बुधवार पेठ' या कविता आणखी काही पैलूंचा वेध घेतात.

'सत्य म्हणजे काय?' स्वतःला विचारशील समजणार्या मनुष्यप्राण्याच्या आयुष्यातील कदाचित सर्वात सनातन प्रश्न असेल. उत्पलने नव्या जगाच्या, नव्या व्यवस्थेच्या संदर्भात आपल्या कवितेच्या माध्यमातून त्याचा वेध

घेण्याचा प्रयत्न केला आहे. दोन भागात लिहिलेली अभंगांच्या पठडीतलई 'सत्य' ही कविता एकाच वेळी व्यापक नि खोलही. अभंगाच्या धाटणीने लिहित असल्याने शब्दसंख्येचा अचूक वापर  करण्याचे भान सांभाळावे लागते. उत्पलची 'सत्य' ही कविता व्याप्ती आणि खोली या दोन्ही बाबतीर पुरेपूर न्याय देते असं म्हणावं लागेल.

आठदहा शब्दांत एक एक विषय, एक संदर्भक्षेत्र मांडून दाखवणे हे शिवधनुष्य त्याने लीलया पेललेले दिसते. 'सत्य पंचतत्त्व | सत्य गुणसूत्र | सत्य अणुस्फोट | पृथ्वीवरी |' अशी त्याची अमर्याद व्याप्ती अजमावत असतानाही 'रक्तनलिका सत्य | रक्तपात सत्य | रक्तद्वेष सत्य | अंतरात |' अशी जगण्याच्या मूलभूत प्रेरणांवरही भाष्य करत जाते.  पुढे राष्ट्रवाद, भूकबळी, शेतकर्यांच्या आत्महत्या, वांशिक हत्या, भाषित्/विभागीय/ जातीय भेदाभेद इ. विषयानाही स्पर्श करते. निव्वळ घटना, वास्तव यांच्यापाशीच न थांबता 'सत्य मुक्त नाही,

मेंदूचा तुरुंग| सत्त्याची सीमा, सापेक्षता|' असे भाष्य करते किंवा 'रॅशनल सत्य | नोशनल सत्य | अंतिम क्लॅरिटी | कम्फ्यूजन|' असे म्हणत त्या शोधाची परिणतीही मांडून जाते.

'रिव्हेंज' ही एक अफलातून कल्पना आहे. कविता लहानशीच नि कल्पनाही. पण त्यातून उमटणार्या अनुभूतीची व्याप्ती जितकी मोजाल तितकी व्यापक. जगाच्या रहाटगाडग्यामधे अनेक संदर्भ लुप्त होतात, व्यवस्थांचे नीतीनियम बदलतात, त्या व्यवस्थांचे भागधारक बदलतात, किंवा ते भागधारक तेच राहून त्यांचे फक्त गुणधर्मच बदलतात. पाहता पाहता 'जुने' काही नव्या व्यवस्थेशी विसंगत, विसंवादी, संदर्भहीन, गैरलागू (redundant) ठरत जाते नि हळू हळू निष्प्रभ, पराभूत होत अडगळीत जाऊन पडते. मग आता या 'जुन्या'कडे आपले अस्तित्व, आपली किंमत टिकवून धरण्यासाठी, त्या अडगळीतून बाहेर येण्यासाठी काय पर्याय राहतात. या सार्या जगताचा निर्माता, नियंता असलेला देवही आज 'पैसा' या नव्या नियंत्रक व्यवस्थेने

पदच्च्युत केला आहे नि केविलवाणेपणे आपले स्थान किमान पातळीवर टिकावे यासाठी त्यानेच निर्माण केलेल्या त्या जगाला चालवण्यासाठी नव्या व्यवस्थेने तयार केलेल्या निर्बुद्ध, आळशी पण पैसा बाळगून असलेल्या माणसाकडेच नाईलाजाने, लाचारपणे पैसे मागताना दिसतो. हा नव्या व्यवस्थेने जुन्या व्यवस्थेवर घेतलेला एक सूड आहे.

**निव्वळ पारलौकिक देव असे न मानता देव हा जुन्या व्यवस्थेचा निर्माता, नियंत्रक नि सामान्य माणूस ही त्या जुन्या व्यवस्थेची निर्मिती, तिनेच पोसलेला घटक या दृष्टीने पाहता ही कविता व्यावहारिक पातळीवर वेगळेच अर्थ समोर ठेवून जाते.**

अर्वाचीन कवितेच्या वाटेने प्रवास करताना अचानक 'अवधान' मधेच भेटते. प्रार्थनेचा बाज असलेली ही कविता 'बुद्धिजन्य स्वार्थास माझ्या | दयाघना, अवधान दे' म्हणताना 'भावनेला येऊ दे गा शास्त्रकाट्याची कसोटी' म्हणणार्या मर्ढेकरांची आठवण करून देते. जगण्याचे नवे संदर्भ टिपत त्याबद्दल विचक्षण दृष्टीने भाष्य करत असतानाच जाणिवेच्या पातळीवर खोल

उतरत जाते.

**- डॉ. मंदार काळे**

**पुस्तकः सायलेंट मोडमधल्या कविता**

**कवी: उत्पल व. बा.**

**अमलताश बुक्स, पुणे**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

# कविता- ऑडियो

पुढील दुव्यावर कवितेचा ऑडियो ऐकता येईल.
एकच व्हावा घाव

-कामिनी केंभावी

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

---

*प्रकाशक- साहित्यसंस्कृती प्रकाशन*

*[www.sahityasanskruti.com](http://www.sahityasanskruti.com)*

*संपादन- सोनाली जोशी*
*संपादन सल्लागार- कामिनी केंभावी*
*मुखपृष्ठ -मयूर कुलकर्णी(atizmayur@gmail.com)*




*All rights reserved. No part of these poems can be published without the written consent of the poet/poetess.*

To submit your poems/ writing/join the team please send an email to-

[anahatmagazine@gmail.com](mailto:anahatmagazine@gmail.com)

Please like us on Facebook at

[www.facebook.com/sahityasanskruti](http://www.facebook.com/sahityasanskruti)

***Thank You!***